**सन्माननीय अध्यक्ष महोदय,**

आज ८ मार्च. आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून हा आज दिवस साजरा केला जातो, हे आपणा सर्वांना माहित आहे. त्यानिमित्ताने मी सुरुवातीलाच राज्यातील सर्व माता-भगिनींना, युवती-विद्यार्थिनींना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या शुभेच्छा देतो. राज्याचा आर्थिक विकास गतिमान करण्यात लोकसंख्येचा ४८ टक्क्यांहून अधिक भाग असलेल्या महिलांचा सहभाग फार मोठा आहे, हे मला सुरुवातीलाच सांगितले पाहिजे. राज्याचा सर्वसमावेशक विकास महिलांच्या सक्रीय सहभागानेच साध्य होईल, असा आमचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे, या अर्थसंकल्पात महिलांसाठी काही विशेष योजना सुरु करण्याचा शासनाचा मनोदय आहे. त्याची माहिती पुढे येईलच.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या ६ मार्च २०२० रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात मी कोविड आजाराचे गांभीर्य विशद केले होते. या विषाणूच्या प्रसाराला त्यावेळी भारतात नुकतीच सुरुवात झाली होती. पण, नंतर पंधरा दिवसांतच देशात टाळेबंदी लागू करावी लागली. कोरोनामुळे उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीचा त्यानंतर वर्षभर आपण अनुभव घेतला. आजही त्या कोविड महामारीशी आपण सर्वजण लढतो आहोत. या लढाईत सहभागी झालेल्या कोविडयोद्ध्यांना मी आदरपूर्वक अभिवादन करतो, आजारात बळी पडलेल्या राज्यातील नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करतो. महिला पोलीस, डॉक्टर, परिचारिका, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका,स्वच्छता सेविका आणि अन्य क्षेत्रातील कोविड योध्दे म्हणून कामगिरी करणाऱ्या महिलांच्या कार्याचाही इथे सन्मानपूर्वक उल्लेख करतो.

अध्यक्ष महोदय, आपल्या अनुमतीने मी आता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा, महाविकास आघाडी सरकारचा दुसरा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करतो.

**आरोग्यसेवा**

कोरोना महामारीच्या काळात सर्वच क्षेत्रांतील आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे.

१. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धन करून जनतेला उत्तम दर्जाची आरोग्यसुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प तयार केला असून येत्या चार वर्षांत तो पूर्ण करण्यात येईल.

या प्रस्तावात जिल्हा रुग्णालय, मनोरुग्णालय, ट्रॉमा केअर सेंटर, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे बांधकाम तसेच तालुकास्तरावरील रुग्णालयांचे श्रेणीवर्धन आणि बांधकाम यांचा समावेश आहे.

**नागरी आरोग्य सेवा**

२. राज्याच्या वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरी जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची प्रभावी, परिणामकारक अंमलबजावणी करता यावी यासाठी राज्य शासनाने आरोग्य आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली संचालक, नागरी आरोग्य या कार्यालयाची निर्मिती केली आहे. त्याद्वारे कालबद्ध पद्धतीने, अभियान स्वरुपात महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये आरोग्यसेवाविषयक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. येत्या ५ वर्षांत त्यासाठी शासनाकडून ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यापैकी ८०० कोटी रुपये यावर्षी, सन २०२१-२२ मध्ये उपलब्ध करून देण्यात येतील.

**साथ रोग अद्ययावत संदर्भ सेवा रुग्णालये स्थापन करणे**

३. राज्यामध्ये संसर्गजन्य आजारांच्या उपचारांसाठी अद्ययावत रुग्णालये आवश्यक आहेत, हे कोरोना साथीमुळे स्पष्ट झाले आहे. औंध येथील जिल्हा रुग्णालय परिसरात राज्याचे अद्ययावत संसर्गजन्य आजार संदर्भ रुग्णालय स्थापन करण्यात येईल. विभागीय व जिल्हा पातळीवर या रुग्णालयाची उप केंद्रे टप्प्याटप्प्याने स्थापन करण्याची योजना आहे.

**कार्डीयाक कॅथलॅब**

४. हृदयविकाराच्या रुग्णांना प्रकृतीत बिघाड जाणवू लागल्यानंतर २४ तासांच्या आत ॲंजिओग्राफी करणे आवश्यक असते. त्यासाठी राज्यातील ८ मध्यवर्ती ठिकाणी यावर्षी कार्डीयाक कॅथलॅब स्थापन करण्यात येणार आहेत.

**ग्रामीण भागामध्ये कर्करोग निदानाची सोय**

५. विविध प्रकारच्या कर्करोगाच्या निदानासाठी तालुकास्तरावर राज्यात १५० रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

**रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा स्थापन करणे**

६. ज्या शासकीय रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजनांची कमतरता आहे, त्या रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक उपकरणे बसविण्यात येतील.

**नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करणे**

७. सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड आणि सातारा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अमरावती व परभणी येथेही वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची क्षमतावाढ आणि स्थापन होणाऱ्या नवीन शासकीय महाविद्यालयांमुळे राज्यात पदवी स्तरावरील १ हजार ९९० तर पदव्युत्तर स्तरावर १ हजार, आणि विशेषज्ञांच्या २०० जागा वाढणार आहेत.

नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याकरिता जमीन, पायाभूत सुविधा, बांधकाम, वित्त पुरवठा, संचालन व देखभाल यांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते. त्यामुळे नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याकरिता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सार्वजनिक-खाजगी भागिदारीचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**अभिमत विद्यापीठाचा दर्जा**

८. ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई व बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

**परिचर्या, भौतिकोपचार व व्यवसायोपचार**

९. परिचर्यांची कमतरता आणि संसर्गजन्य आजारांचा वाढता फैलाव विचारात घेऊन रुग्णसेवांशी संबंधित इतर अभ्यासक्रमांमध्येही आमूलाग्र बदल करून रुग्णसेवेशी निगडीत शाखांना प्रोत्साहन व प्राधान्य देण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न ११ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयांमध्ये रुपांतर करण्यात येणार आहे. शिवाय १७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडून भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालयांची टप्प्याटप्प्याने स्थापना करण्यात येणार आहे.

**कोविड पश्चात शुश्रुषा** १०. कोरोना संसर्गातून बऱ्या झालेल्या रुग्णांमध्ये फुफ्फुस, यकृत व मूत्रपिंडांच्या तसेच मानसिक तणावाच्या तक्रारी उद्‌भवत असल्याने प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये व शहरी भागात वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, ‘कोविड पश्चात समुदेशक व उपचार केंद्र’ सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**आरोग्य संस्थांची बांधकामे** ११. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय शिक्षण संस्था, लातूर येथील नवीन बाह्यरुग्ण इमारतीच्या बांधकामासाठी ७३ कोटी २९ लाख रुपये, तर ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या बांधकामासाठी २८ कोटी २२ लाख रुपये अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सांगली येथील जिल्हा रुग्णालय तसेच महिला रुग्णालयाची ९२ कोटी १२ लाख रुपये अंदाजित किमतीची दोन कामे तसेच आटपाडी येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन त्याचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्यासाठी २० कोटी ६२ लाख रुपये अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे** १२. अन्न व औषध प्रशासनांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी तसेच औषध व्यावसायिकांकरिता सुधारित कायद्यांची माहिती देण्यासाठी मोशी (जि. पुणे) येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक आरोग्य विभागास २ हजार ९६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. शिवाय, अनिवार्य खर्चासाठी ५ हजार ९९४ कोटी २८ लाख ८९ हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

वैद्यकीय शिक्षण विभागास कार्यक्रम खर्चाकरिता १ हजार ५१७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. शिवाय, अनिवार्य खर्चासाठी ४ हजार २४ कोटी ६३ लाख ६३ हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

## कृषी विकास

आरोग्यपूर्ण जीवन ही जशी माणसाच्या सुखी आयुष्याची पूर्वअट आहे, तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आरोग्य कृषी क्षेत्राच्या सुदृढतेवर अवलंबून आहे. केंद्र सरकारने पारित केलेल्या तीन कृषी कायद्यांतील तरतुदींच्या विरोधात संपूर्ण देशातील शेतकरी गेल्या १०० दिवसांपेक्षाही अधिक काळ दिल्लीतल्या कडक थंडी, वारा, ऊन, पावसाचा सामना करत आंदोलन करत आहेत. शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांच्या पाठीशी आम्ही भक्कमपणे उभे आहोत. सन २०२०-२१ मध्ये उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये घट झाली असतांनाही कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रात ११.७ टक्के एवढी भरीव वाढ झाली आहे. कठीण काळात राज्याच्या कृषी क्षेत्रानेच अर्थव्यवस्थेला

सावरले आहे. या बळीराजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. म्हणूनच त्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ व्हावी, यासाठी आम्ही जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहोत. शेतमालासंदर्भातील व्यवहार अधिकाधिक पारदर्शी व्हावा आणि त्यांना योग्य भाव मिळावा, यासाठी हे शासन प्रयत्नशील आहे.

**शून्य टक्के व्याजाने पीककर्ज**

१३. एकाही शेतकऱ्याने कर्जाच्या ओझ्याखाली आत्महत्या करु नये, यासाठी महाविकास आघाडी सरकारकडून महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ ही अत्यंत सोपी, सुलभ, शेतकऱ्यांना हेलपाटे घालावे न लागता लाभ घेता येईल अशी योजना राबविण्यात आली. या योजनेतून ३१ लाख २३ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांवर १९ हजार ९२९ कोटी रुपयांची रक्कम थेट वर्ग करण्यात आली. शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्याचा मार्गही त्यामुळे, मोकळा झाला. सन २०१९-२० मध्ये २८ हजार ६०४ कोटी रुपये, तर कर्जमुक्तीनंतर सन २०२०-२१ मध्ये ४२ हजार ४३३ कोटी रुपयांचे पीककर्जाचे वाटप पूर्ण करण्यात आले आहे.

अनेकदा पीक कर्जावरील व्याज भरणेही शेतकऱ्यांसाठी अडचणीचे होते. व्याजाच्या या जाचातून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी व शेतकरी थकबाकीदार होऊ नये, हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून शासनाने ३ लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत पीक कर्ज घेणाऱ्या व ते वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२१ पासून शून्य टक्के व्याजाने कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. पिककर्जावरील व्याजाची रक्कम शेतकऱ्यांच्यावतीने शासनामार्फत चुकती करण्यात येईल. त्यासाठी आवश्यक तेवढा निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिला जाईल.

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे बळकटीकरण**

१४. राज्यातील शेतकरी त्याचा शेतमाल विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारात घेऊन जातो. पण बहुतांशी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांकरिता आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव आहे. या सुविधा पुरविणे अत्यंत गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण करण्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची योजना मी घोषित करीत आहे.

**कृषीपंप वीज जोडणी धोरण**

१५. पैसे भरुनही ज्यांना अद्यापपर्यंत कृषीपंप वीज जोडणी मिळाली नाही, अशा शेतकरी अर्जदारांना पारंपरिक अथवा सौर कृषीपंपाच्या माध्यमातून वीज जोडणी देण्याकरिता कृषीपंप वीज जोडणी धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ही योजना राबविण्याकरिता महावितरण कंपनीला दरवर्षी १ हजार ५०० कोटी रुपये निधी भागभांडवलाच्या स्वरुपात देण्यात येईल.

**शेतकऱ्यांना वीज बिलात सवलत**

१६. थकीत वीजबिलात शेतकऱ्यांना ३३ टक्के सूट देण्यात आली असून शेतकऱ्यांनी उर्वरित थकबाकीपैकी ५० टक्के रकमेचा भरणा मार्च, २०२२ पर्यंत केल्यास त्यांना राहिलेल्या ५० टक्के रकमेची अतिरिक्त माफी देण्यात येईल. महाविकास आघाडी सरकारच्यावतीने ४४ लाख ३७ हजार शेतकऱ्यांना मूळ थकबाकी रकमेच्या जवळपास ६६ टक्के, म्हणजे ३० हजार ४११ कोटी रुपये इतकी रक्कम माफ केली जाणार आहे.

**मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प**

१७. ‘विकेल ते पिकेल’ या धोरणांतर्गत शेतमालाच्या बाजारपेठ व मूल्यसाखळ्यांच्या निर्मितीसाठी एकूण २ हजार १०० कोटी रुपये अंदाजित किमतीचा मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्यात येत आहे, त्यातून शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी १ हजार ३४५ मूल्यसाखळी प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

**महाराष्ट्र ॲग्रो बिजनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट)**

१८. फळ व भाजीपाला उत्पादक, लहान व सीमान्त शेतकऱ्यांसाठी ‘महाराष्ट्र ॲग्रो बिजनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट)’ प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा संकल्प आहे. सदर प्रकल्पाची किंमत १ हजार कोटी रुपये असून प्रकल्प ६ वर्ष राबविला जाणार आहे. शेतमालावरील प्रक्रियेत सुधारणा करणे व नाशवंत मालाचे नुकसान कमी व्हावे यासाठी उपाययोजना करण्याचा समावेश या प्रकल्पामध्ये समावेश आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.

**सायट्रस इस्टेट स्थापन करणे**

१९. विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहे. मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे ६२ एकर जागेवर ‘सायट्रस इस्टेट’ स्थापन करण्यात येणार आहे.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका**

२०. उत्पन्न वाढीकरिता शेतकरी मुख्य पिकासोबत भाजीपाला पिकाची लागवड करतो. शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर दर्जेदार भाजीपाला रोपांचा पुरवठा होण्यासाठी प्रत्येक तालुक्यात किमान एक, याप्रमाणे सुमारे ५०० नवीन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**महाडिबीटी पोर्टल**

२१. शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कृषी योजनांचा लाभ शेतकऱ्याला सहजगत्या एकाच अर्जाद्वारे उपलब्ध व्हावा, यासाठी डिसेंबर, २०२० मध्ये महाडिबीटी पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. या पोर्टलवर आतापर्यंत ११ लाख ३३ हजार शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून विविध कृषी योजनांच्या लाभाकरिता २५ लाख २२ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत.

**मुख्यमंत्री कृषी संशोधन निधी**

२२. राज्यातील शेती व्यवसायाची उत्पादकता वाढविण्याच्या अनुषंगाने कृषी संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. मागील सरकारने त्याकरिता घोषणाही केली होती, महाविकास आघाडी सरकारने मात्र राज्यातील ४ कृषी विद्यापीठांना कृषी उन्नतीला उपयोगी ठरेल अशा संशोधनासाठी दरवर्षी २०० कोटी रुपयांप्रमाणे येत्या ३ वर्षांत ६०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याचे निश्चित केले आहे.

**शरद पवार ग्राम समृद्धी योजना**

२३. ग्रामीण भागात सामूहिक व वैयक्तिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने शरद पवार ग्राम समृद्धी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थींना गाय किंवा म्हशीचा पक्का गोठा बांधण्यासाठी, शेळीपालन किंवा कुक्कुटपालनाचे शेड बांधण्याचे तसेच कंपोस्टींगकरता अनुदान देण्यात येईल.

**फिशरीज अँड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड (मत्स्य व्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा निधी योजना)**

२४. मत्स्य व्यवसाय क्षेत्रातील विविध पायाभूत सुविधांच्या कामासाठी नाबार्डच्या सहाय्याने 'फिशरीज अँड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड' मधून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

**उच्चश्रेणी जैव सुरक्षा प्रयोगशाळा उभारणे**

२५. राज्याने मागील वर्षी बर्ड फ्ल्युसारख्या घातक रोगाचा सामना केला. यावर्षीही काही प्रमाणात त्याचा सामना करावा लागत आहे. या रोगनिदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे येथे उच्चश्रेणीची जैव सुरक्षा प्रयोगशाळा उभारण्यात येईल.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागास ३ हजार २७४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

रेशीम शेती उद्योग

२६. रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र व इतर अनुषंगिक सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास १ हजार २८४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**जलसंपदा**

जलसंपदा प्रकल्प

२७. राज्यात जलसंपदा विभागाची २७८ प्रकल्पांची कामे सुरु असून त्यामधून २६ लाख ८८ हजार ५७६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणे अपेक्षित आहे. त्यातून ८ हजार ४७० दश लक्ष घन मीटर इतका पाणीसाठा निर्माण होणार आहे.

‘प्रधानमंत्री कृषि सिंचन’ योजनेअंतर्गत २६ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली असून या प्रकल्पांची सुधारित उर्वरीत किंमत २१ हजार ६९८ कोटी २१ लाख इतकी आहे. सन २०२१-२२ या वर्षात २६ पैकी १३ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

‘बळीराजा जलसंजीवनी योजने’ अंतर्गत ९१ प्रकल्पाची कामे हाती घेण्यात आली असून या प्रकल्पांची सुधारित किंमत १५ हजार ३२५ कोटी ६५ लाख इतकी आहे. यांपैकी १९ प्रकल्प पूर्ण झाले असून त्यातून १ लाख २ हजार ७७९ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

जलसंपदा विभागाच्या पूर्णत्वाच्या टप्प्यावर असलेल्या इतर सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात येतील.

गोसीखुर्द प्रकल्प

२८. गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी एक हजार कोटी रुपये एवढी भरीव तरतूद प्रस्तावित केली असून हा प्रकल्प डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प

२९. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने धरण सुरक्षिततेसाठी ‘धरण पुनर्स्थापना व सुधारणा’ हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत १२ धरणांच्या बळकटीकरण आणि सुधारणांच्या, ६२४ कोटी रुपये किमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

लाकडी-निंबोडी उपसा सिंचन योजना, ता. इंदापूर, जि. पुणे

३०. इंदापूर व बारामती तालुक्यांतील सुमारे ५ हजार हेक्टर क्षेत्रास बंद नलिकांद्वारे सिंचनाचा लाभ देण्यासाठी लाकडी-निंबोडी उपसा सिंचन योजना राबविण्यात येत आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता जलसंपदा विभागास १२ हजार ९५१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

३१. राज्यातील ६०० हेक्टर सिंचन क्षमतेपर्यंतच्या नादुरुस्त असलेल्या जलस्त्रोतांची विशेष दुरुस्ती मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत करण्यात येत आहे. यात ७ हजार ९१६ कामांची विशेष दुरुस्ती प्रस्तावित असून त्यावर १ हजार ३४० कोटी ७५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. हा कार्यक्रम मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मृद व जलसंधारण विभागास ३ हजार ७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## मदत व पुनर्वसन

शेतकऱ्यांना नुकसान भरपाई

३२. जून, २०२० मध्ये कोकण किनारपट्टीवरील निसर्ग चक्रीवादळ, पूर्व विदर्भात निर्माण झालेली पूर परिस्थिती, जून ते ऑक्टोबर या काळात राज्यात झालेली अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना ५ हजार ६२४ कोटी रुपये एवढी मदत वितरित करण्यात आली.

राष्ट्रीय आपत्ती निवारण दल

३३. या आपत्तीवेळी निर्माण झालेली निकड लक्षात घेऊन नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तत्पर मदत मिळावी म्हणून राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाची एक तुकडी महाड, जि. रायगड येथे कायमस्वरुपी तैनात करण्याबाबत आपल्या शासनाने केंद्र शासनास विनंती केली आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मदत व पुनर्वसन विभागास १३९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. शिवाय, नैसर्गिक आपत्ती मदत व इतर अनिवार्य खर्चासाठी ११ हजार ३१५ कोटी ७८ लाख ६२ हजार रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

## पायाभूत सुविधा

सन २०२०-२१ मध्ये राज्याच्या स्थूल उत्पन्नात ८ टक्के घट झाली आहे. तरीही अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी या अर्थसंकल्पात रोजगार निर्मितीच्या व कल्याणकारी योजनांबरोबरच पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला.

## रस्ते विकास

जालना-नांदेड द्रुतगती जोडमहामार्ग

३४. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे काम ४४ टक्के पूर्ण झाले असून ७०१ किलोमीटर लांबीपैकी ५०० किलोमीटर लांबीचा नागपूर ते शिर्डी हा मार्ग महाराष्ट्र दिनी, १ मे २०२१ रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. या महामार्गाचा, मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी व जालना या जिल्ह्यांच्या विकासासाठी लाभ व्हावा, या उद्देशाने नांदेड ते जालना या २०० किलोमीटर लांबीचे ७ हजार कोटी रुपये अंदाजित रकमेचे द्रुतगती जोडमहामार्गाचे नवीन काम हाती घेण्यात येत आहे.

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाची क्षमता वाढ

३५. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर साडेदहा किलोमीटर लांबीच्या दोन भुयारी मार्गांच्या, तसेच दोन किलोमीटर लांबीच्या दोन पुलांचा समावेश असलेल्या ६ हजार ६९५ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पांचे बांधकाम सुरु असून ते डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सागरी महामार्ग

३६. मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय ठरणारा आणि कोकणाच्या विकासाचा मार्ग म्हणून ओळखला जाणारा रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी अशा ५४० किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गाच्या कामासाठी ९ हजार ५७३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

पुणे चक्राकार मार्ग

३७. परराज्यातून तसेच राज्यातील कोकण, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात प्रवासी व मालवाहतूक पुणे शहरातून होत असते. शहरातील वाहतुकीवर त्याचा प्रचंड ताण येतो. तो टाळून इंधन तसेच प्रवासी वेळेत बचत होण्याच्या दृष्टीने पुण्याबाहेरून चक्राकार मार्गाची (रिंग रोड) उभारणी ही काळाची गरज आहे. त्यासाठी सुमारे १७० किलोमीटर लांबीच्या २६ हजार कोटी रुपये अंदाजित किमतीच्या आठ पदरी, चक्राकार मार्गाचे काम हाती घेण्यात येईल. या मार्गामुळे पुणे शहरातील वाहतूक कोंडीच्या गंभीर समस्येवर मात करता येईल. या कामाच्या भूसंपादनाचे काम याच वर्षी हाती घेण्यात येईल.

विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्ग

३८. दक्षिण मुंबईला पूर्व उपनगरांशी जोडणाऱ्या पूर्व मुक्त मार्गाचे नामकरण 'विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्ग' करण्याचा निर्णय मी येथे जाहीर करत आहे.

**वित्तीय विकास महामंडळ** ३९. राज्यात आतापर्यंत राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग मिळून एकूण ३ लाख ३ हजार ८४२ किलोमीटर पेक्षा जास्त लांबीचे रस्ते विकसित करण्यात आले आहेत, त्यांची कालबद्ध सुधारणा व नियमित देखभाल दुरुस्ती यासाठी निधी उभारण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वित्तीय विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.

**आशियाई विकास बँक सहाय्यित रस्ते विकास** ४०. आशियाई विकास बँकेच्या अर्थ सहाय्यातून पहिल्या टप्प्यात ५ हजार ६८९ कोटी रुपये अंदाजित किमतीची कामे हाती घेण्यात आली आहेत. सन २०२१-२२ मध्ये बाह्यसहाय्यातून आणखी ५ हजार कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येतील.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास रस्ते विकासासाठी १२ हजार ९५० कोटी रुपये व इमारतींसाठी ९४६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**नागरी सडक विकास योजना** ४१. राज्याचे वाढते नागरीकरण लक्षात घेता सर्व शहरातील मुख्य बाजारपेठांच्या रस्त्यांची दर्जोन्नती, रुंदीकरण व सुशोभिकरणासाठी नागरी सडक विकास योजना राबविण्याचे सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात घोषित करण्यात आले होते. या वर्षी या कार्यक्रमाला अधिक गती देण्यात येईल.

**ग्रामीण सडक विकास योजना** ४२. ग्रामीण भागातील रस्ते विकासाची ४० हजार किलोमीटर लांबीची कामे हाती घेऊन ती सन २०२० ते २०२४ या कालावधीत पूर्ण करण्याचे मी गेल्या अर्थसंकल्पात जाहीर केले होते. पण गेल्यावर्षी टाळेबंदीमुळे कामे हाती घेता आली नाहीत. त्यातील १० हजार किलोमीटर लांबीची कामे यावर्षी सन २०२१-२२ मध्ये हाती घेण्यात येतील.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ग्रामविकास विभागास ७ हजार ३५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## रेल्वे विकास

**पुणे नाशिक रेल्वे प्रकल्प**

४३. पुणे-नाशिक या मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यास महाविकास आघाडी शासनाने नुकतीच मान्यता दिली. या रेल्वेमार्गाची प्रस्तावित लांबी २३५ किलोमीटर असून मार्गावर पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यात एकूण २४ स्थानके प्रस्तावित आहेत. या मध्यम अतिजलद रेल्वेची गती २०० किलोमीटर प्रतितास एवढी असणार आहे. प्रकल्पाचा अपेक्षित खर्च १६ हजार ३९ कोटी रुपये इतका राहील.

**राज्यातील मेट्रो प्रकल्प**

४४. नागपूर शहर, वर्धा, रामटेक, भंडारा रोड व नरखेड ही शहरे नागपूर मेट्रो मार्गाला जोडण्यासाठी वातानुकुलित ब्रॉडगेज मेट्रो ट्रेन हा २६९ किलोमीटर लांबीचा प्रकल्प, नाशिक शहरामध्ये ३३ किलोमीटर लांबीचा २ हजार १०० कोटी रुपये किंमतीचा 'नाशिक मेट्रो निओ प्रकल्प', ठाणे शहरांतर्गत मेट्रोलाईट प्रणालीवर आधारीत ७ हजार १६५ कोटी खर्चाचा वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प तसेच पिंपरी-चिंचवड ते निगडी कॉरीडॉर क्रमांक १ हा ९४६ कोटी ७३ लाख रुपये किमतीचा प्रकल्प, हे मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. याशिवाय राज्यात अहमदनगर-बीड-परळी, वर्धा-यवतमाळ-नांदेड व नागपूर येथील इतवारी ते नागभीड या रेल्वे मार्गांची कामे वेगाने सुरु आहेत.

**राज्य परिवहन महामंडळास अर्थसहाय्य**

४५. राज्य परिवहन महामंडळाच्या डिझेलवर चालणाऱ्या जुन्या बसेसचे पर्यावरणपूरक सीएनजी व विद्युत बसेसमध्ये रुपांतर करण्याचे शासनाने ठरवीले आहे. शिवाय बसस्थानकांचे आधुनिकीकरणाचे कामही हाती घेण्यात येत आहे. त्यासाठी १ हजार ४०० कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता परिवहन विभागास एकूण २ हजार ५७० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## विमान वाहतूक क्षेत्र

४६. शिर्डी विमानतळावरील नवीन हवाई वाहतूक नियंत्रण मनोरा, रात्रीच्या उड्डाणाची सुविधा तसेच प्रवासी सेवांची कामे सुरु आहेत.

४७. अमरावती जिल्ह्यातील बेलोरा येथील विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार, नवीन टर्मिनल बिल्डींग तसेच रात्रीच्या विमानवाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

४८. सोलापूर शहराजवळ बोरामणी येथे ग्रिनफिल्ड विमानतळ विकसित करण्यास आम्ही कटीबद्ध आहोत. या विमानतळासाठी भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

४९. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळावर विमानसेवा सुरु करण्याची बाब अखेरच्या टप्प्यात आहे.

५०. पुणे येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यास शासनाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. या कामाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

५१. शिवणी, अकोला येथे मोठ्या विमानांच्या उड्डाणासाठी धावपट्टी वाढविणे व इतर कामांसाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे.

५२. उजळाईवाडी, कोल्हापूर येथील विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणाचे तसेच रात्रीच्या उड्डाणासाठीची कामेही प्रगतीपथावर आहेत.

## ग्रामविकास

**घरकुल योजना**

५३. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना व शबरी घरकुल योजनेअंतर्गत प्रलंबित दायित्वाकरिता एकूण २ हजार ९२४ कोटी ८८ लाख रुपये निधी वितरित केला आहे.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात घरकुल योजनांसाठी ६ हजार ८२९ कोटी ५२ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## मनुष्यबळ विकास

**राज्यातील शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STARS)**

५४. राज्यातील इयत्ता १२ वी पर्यंतच्या दर्जेदार शिक्षणासाठी, शिक्षण क्षेत्रात मूलभूत सुधारणांकरिता शिक्षण पद्धतीचे अध्यापन , अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण यासाठी जागतिक बँकेच्या सहकार्याने STARS योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेची अंदाजित किंमत ९७६ कोटी ३९ लाख रुपये आहे.

**राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान**

५५. शासकीय व जिल्हा परिषद शाळांच्या जीर्णावस्थेतील इमारतींची पुनर्बांधणी व दुरुस्ती करण्याकरिता ३ हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**शाळांना अर्थसहाय्य**

५६. देशातील पहिली सैनिकी शाळा सन १९६१ मध्ये सातारा येथे स्थापन करण्यात आली. या शाळेच्या मूलभूत सुविधांच्या विकासासाठी येत्या तीन वर्षात ३०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित असून सन २०२१-२२ या वर्षात त्यापैकी १०० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, पुणे स्थापन करणे**

५७. मागील अर्थसंकल्पीय भाषणात मी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्यात येईल, असे घोषित केले होते. त्यानुसार पुणे येथे महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात तिथे क्रीडा विज्ञान व तंत्रज्ञान, क्रीडा शिक्षण व प्रशिक्षण अशा चार अभ्यासक्रमांसाठी एकूण २०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता शालेय शिक्षण व क्रीडा विभागास २ हजार ४६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क**

५८. सध्याच्या काळात देशात फसव्या विज्ञानाचा जाणीवपूर्वक प्रसार होत असताना, पुरोगामी महाराष्ट्रातील भावी पिढीत अभिजात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविणे ही आपली जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक महसुली मुख्यालयाच्या जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक ‘ राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क ’ स्थापन करण्याचा निर्णय या शासनाने घेतला आहे. त्यासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपये, अशाप्रकारे एकूण ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**नेहरू तारांगण**

५९. नेहरु सेंटर, मुंबई या संस्थेस अत्याधुनिक यंत्रांची खरेदी, आधुनिकीकरण व नूतनीकरणासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**संस्थांना अनुदाने**

६०. अमरावती येथील विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त या संस्थेतील महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी १० कोटी रुपये तसेच मुंबईतील मुलुंड येथील कुणबी समाजोन्नती संघाच्या विद्यार्थी वसतिगृहासाठी ५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागास १ हजार ३९१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

कौशल्य विद्यापीठाची स्थापना

६१. युवकांना यापुढील काळात रोजगारासाठी नवनवीन कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक ठरणार आहे. त्यादृष्टीने राज्यातील युवकांसाठी खास कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यवाहीही सुरु झाली असून या विद्यापीठामुळे राज्यातील युवांना लवकरच कौशल्य प्रशिक्षण सुरु होईल. त्यातून युवक-युवती रोजगारक्षम बनतील.

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (M.A.P.S.)

६२. मागील अर्थसंकल्पीय भाषणात मी दिनांक १५ ऑगस्ट २०२० पासून राज्यात महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना सुरु करण्याचेही घोषित केले होते. मात्र, कोविड प्रादुर्भाव व टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर या योजनेची सुरुवात करता आली नाही. या योजने अंतर्गत शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा ५ हजार रुपये यांपैकी जी कमी असेल ती रक्कम शासनाकडून देण्यात येईल. ही योजना येत्या महाराष्ट्र दिनी १ मे २०२१ रोजी सुरु करण्यात येईल. सन २०२१-२२ मध्ये दोन लाख युवा उमेदवारांना या योजनेत सहभागी करून घेतले जाईल. या योजनेच्या माध्यमातून युवक-युवतींना रोजगाराच्या निश्चित संधी उपलब्ध होतील, असा विश्वास मला आहे.

## पाणीपुरवठा व स्वच्छता

पाणी पुरवठा योजना

६३. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सन २०२४ पर्यंत एकूण १ कोटी ४२ लाख ३६ हजार १३५ घरगुती नळ जोडण्या देण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले होते, त्यापैकी जानेवारी, २०२१ पर्यंत ८४ लाख ७७ हजार ८४६ नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर ७४३ पैकी ४३८ नवीन नळ योजना कार्यान्वित झाल्या आहेत.

शिवराज्य सुंदर ग्राम अभियान

६४. ग्रामीण भागातील घनकचरा, सांडपाणी, शौचालय व स्वच्छता विषयक कामे, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, गावातील वृद्ध नागरिक, महिला व बालकांसाठी आरोग्य सेवेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकाच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ‘शिवराज्य सुंदर ग्राम अभियान’ राबविण्यात येणार असून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य, विभागीय, जिल्हा आणि तालुका स्तरावर भरघोस पुरस्कार देण्यात येतील.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान

६५. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील एकूण ३९६ शहरांच्या ३ हजार १३७ कोटी रुपये किमतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून त्यांची अंमलबजावणीही सुरु आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास २ हजार ५३३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**मुंबईच्या विकासाचे प्रकल्प**

६६. मुंबई शहरातील वाहतूक सुविधा जागतिक दर्जाच्या असाव्यात, असे आपले ध्येय आहे. त्यासाठी सप्टेंबर, २०२२ मध्ये शिवडी-न्हावा शेवा प्रकल्प पूर्ण करण्याचे आमचे नियोजन आहे. वांद्रे-वरळी सागरी मार्ग शिवडी-न्हावा शेवा मार्गाला जोडण्यासाठी वरळी ते शिवडी या चार पदरी उड्डाणपूलाचे काम सुरु झाले असून ते ३ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

विरार, भिवंडी, कल्याण, पनवेल, उरण, पेण व अलिबाग या शहरांच्या विकासाकरिता तसेच जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, नवी मुंबई विमानतळ आणि शिवडी न्हावा शेवा मार्गाला जोडणाऱ्या, ४० हजार कोटी रुपये किमतीच्या, १२६ किलोमीटर लांबीच्या, विरार ते अलिबाग 'मल्टीमोडल कॉरिडॉर' च्या भूसंपादनाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सुरु आहे.

ठाणे खाडीला समांतर सुमारे १५ किलोमीटर लांबीचा व ४० मीटर रूंदीचा 'ठाणे कोस्टल रोड' उभारण्यात येत असून त्यासाठी सुमारे १ हजार २५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

मुंब्रा बायपास जंक्शन, शिळ कल्याण फाटा, शिळफाटा व कल्याणफाटा जंक्शनवर उड्डाणपुलांची निर्मिती, महामार्गाचे रुंदीकरण तसेच कल्याणफाटा अंडरपासचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबई, ठाणे व नवी मुंबई या शहरांभोवती उपलब्ध असलेल्या जलमार्गाचा वाहतुकीसाठी वापर करण्याचे शासनाने ठरविले असून त्यासाठी पहिल्या टप्प्यामध्ये वसई ते कल्याण या जलमार्गावर वाहतूक सुरु करण्यात येईल. त्यासाठी कोलशेत, काल्हेर, डोंबिवली आणि मीरा भाईंदर या चार ठिकाणी जेट्टी उभारण्यात येत आहेत.

**मुंबई अंतर्गत प्रवासासाठी दळणवळण सुविधा**

६७. वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतूचे काम सुरु झाले आहे, हे आपल्याला माहीत असेल. या प्रकल्पाची लांबी १७.१७ किलोमीटर असून प्रकल्पाची अंदाजित किंमत ११ हजार ३३३ कोटी रुपये आहे. वांद्रे - वर्सोवा - विरार या सागरी सेतू प्रकल्पाची अंदाजित किंमत ४२ हजार कोटी रुपये असून कामाचा पूर्व सुसाध्यता अहवाल तयार करण्यात आला आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.

मुंबईतील १४ मेट्रो लाईन्सचे ३३७ किलोमीटर लांबीचे काम प्रगतीपथावर असून त्याकरीता १ लाख ४० हजार ८१४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सर्व १४ मेट्रो लाइन्सची कामे पूर्णत्वाच्या विविध टप्प्यावर आहेत. मेट्रोमार्ग २ अ, मेट्रोमार्ग ७ या मार्गांवरील कामे २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

गोरेगाव-मुलुंड लिंकरोड प्रकल्पाची अंदाजित किंमत ६ हजार ६०० कोटी रुपये असून कामाची निविदाविषयक कार्यवाही सुरु आहे.

मुंबई किनारी मार्ग (कोस्टल रोड) प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरु असून हा मार्ग सन २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सध्या या प्रकल्पाच्या दक्षिण मुंबईतील बोगद्याचे काम सुरु आहे.

मुंबई शहरातील रेल्वे रुळावरील ७ उड्डाणपूलांची कामेही हाती घेण्यात येत आहेत.

**मुंबईतील पर्यटन आकर्षणे**

६८. हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी ४०० कोटी रुपये खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

वांद्रे-कुर्ला संकुलातील सिटी पार्क ते महाराष्ट्र निसर्ग उद्यानादरम्यान, त्यांना जोडणारा पादचारी पूल उभारण्यात येणार असून या प्रकल्पाकरीता ९८ कोटी ८१ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

वांद्रे-कुर्ला संकुलातील सायकल मार्गावरील बॅटरीवर चालणाऱ्या सायकलींना अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे येत्या वर्षभरात मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गांवर मुंबई महानगर क्षेत्र विकास महामंडळामार्फत सायकलींकरिता स्वतंत्र मार्गिका तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

**मुंबई येथील पायाभूत विकास प्रकल्प**

६९. बृन्हमुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून वरळी, वांद्रे, धारावी, घाटकोपर, भांडूप, वर्सोवा व मालाड येथे सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा निर्णय झाला असून त्याकरीता १९ हजार ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

समुद्रातील खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प मालाड उपनगरातील मनोरी येथे उभारण्याबाबत प्राथमिक सर्वेक्षण झाले असून सविस्तर प्रकल्प अहवाल डिसेंबर २०२१ पूर्वी अपेक्षित आहे.

मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प मार्च २०२१ पासून सुरु होणार असून त्याकरीता ४५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मुंबई परिसरातील दहिसर, पोईसर व ओशिवरा नद्या पुनरुज्जीवीत करण्यासाठी १ हजार ५५० कोटी रुपयांची कामे सुरु करण्यात येत आहेत.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नगरविकास विभागास ८ हजार ४२० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**उद्योग, उर्जा व कामगार**

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम**

७०. राज्यातील युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमातून पुढील ५ वर्षात १ लाख उद्योग घटक तयार होतील, आणि त्यात प्रतिवर्षी सुमारे १ हजार ५०० कोटी रुपये गुंतवणूक होईल असा अंदाज आहे. त्यातून ८ ते १० लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होईल. या कार्यक्रमात किमान ३० टक्के महिला तर २० टक्के अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थी असतील. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या योजनेचे उद्दिष्ट वाढवून यावर्षी २५ हजार उद्योग घटकांना मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**गुंतवणूक सामंजस्य करार**

७१. कोविड टाळेबंदी काळात विविध उद्योग घटकांसमवेत ५४ सामंजस्य करार झाले असून त्याद्वारे १ लाख १२ हजार ९३९ कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यातून सुमारे ३ लाख रोजगार उपलब्ध होतील, असा अंदाज आहे.

थेट परकीय गुंतवणूक आणि ५० कोटी रुपये व त्यापेक्षा अधिक गुंतवणूकीच्या औद्योगिक प्रस्तावांना थेट महापरवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**उद्योगांना प्रोत्साहन**

७२. रायगड जिल्ह्यात प्रस्तावित असलेल्या बल्क ड्रग पार्क आणि ऑरिक सिटी, औरंगाबाद येथे प्रस्तावित असलेल्या वैद्यकीय उपकरण पार्क प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार असून या दोन्ही पार्कमध्ये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यातून मोठ्या संख्येने रोजगार निर्मिती होईल हे निश्चित आहे.

**कुटीरोद्योग**

७३. खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत मध उत्पादन व गांधी निलय स्मृती केंद्र स्थापन करण्यासाठी ७० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येत आहे.

**एक जिल्हा एक उत्पादन**

७४. 'एक जिल्हा एक उत्पादन' या उपक्रमाच्या माध्यमातून विविध जिल्ह्यातील प्रसिद्ध हस्तकला, हातमाग, अन्नप्रक्रिया आदी क्षेत्रातील स्थानिक कारागीर, मजूर व कामगारांना कौशल्य वर्धनासाठी सहाय्य करून त्यांच्या उत्पादनांसाठी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येईल.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उद्योग विभागास ३२१ कोटी रुपये नियतव्यय तसेच उद्योगांना प्रोत्साहन अनुदानासाठी ३ हजार ४३५ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

अपारंपरिक उर्जा प्रकल्प

७५. सन २०२५ पर्यंत राज्यात २५ हजार मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक उर्जा प्रकल्प स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ९ हजार ३०५ मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक उर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून २ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

सुधारीत इलेक्ट्रीक व्हेइकल धोरण

७६. ग्रीन हाऊस गॅसेसचा परिणाम कमी करण्यासाठी तसेच शहरातील प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शासनाने सन २०१८ मध्ये ई-व्हेईकलचे धोरण जाहीर केले होते. त्यात आता कालानुरुप सुधारणा करण्यात येत आहे. राज्यामध्ये नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई-नाशिक महामार्गावर मेगा इलेक्ट्रीक व्हेइकल चार्जिंग सेंटर स्थापन करण्यात येतील.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ऊर्जा विभागास ९ हजार ४५३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**महिला व बालविकास**

माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच मी आजचे, ८ मार्चचे महत्त्व सांगितले होते. आजच्या महिला दिनी मी आता विद्यार्थिनी, गृहिणी आणि कष्टकरी महिलांसाठी या शासनाच्या नव्या योजना जाहीर करीत आहे.

**राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना**

७७. ज्या महिलेमुळे घराला घरपण येते, त्या घरावर तिचे नाव असावे, ही माझ्या मायभगिनींची अपेक्षा अवाजवी नाही. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रीयेचाच तो भाग आहे. राज्यातील तमाम महिलांच्या अपेक्षेला न्याय देणारी राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना आज मी घोषित करत आहे. कोणतेही कुटुंब यापुढे राज्यात घर विकत घेईल, तेव्हा त्याची नोंदणी गृहलक्ष्मीच्या नावावर व्हावी व ती खऱ्या अर्थाने गृहस्वामिनी बनावी, यासाठी प्रोत्साहन म्हणून दिनांक १ एप्रिल २०२१ पासून गृहखरेदीची नोंदणी त्या कुटुंबातील महिलेच्या नावावर झाल्यास मुद्रांक शुल्काच्या प्रचलित दरामध्ये सवलत देण्यात येईल. त्याबाबतचा तपशील मी भाग-२ मध्ये जाहीर करेन.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी प्रवास सवलत योजना**

७८. आपले राज्य हे महिला धोरणाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राज्य आहे. मुलींच्या शिक्षणासाठी राज्याने अनेक प्रागतिक पावले उचलली आहेत. मुलींचे बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत केले आहे. आता मी राज्यातील सर्व ग्रामीण तालुक्यातील विद्यार्थिनींना आपल्या गावापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी राज्य परिवहन

महामंडळाच्या बसने मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करुन देणारी राज्यव्यापी योजना जाहीर करीत आहे. ही योजना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सुरु करण्यात येईल. या योजनेसाठी शासनाकडून राज्य परिवहन महामंडळास पर्यावरणपूरक दीड हजार सीएनजी व हायब्रीड बस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येतील.

**तेजस्विनी**

७९. मोठ्या शहरातील महिलांच्या सुलभ व सुरक्षित प्रवासासाठी 'तेजस्विनी योजने' अंतर्गत आणखी विशेष महिला बस उपलब्ध करुन देण्याची घोषणाही मी याबरोबरच करतो आहे.

**नवतेजस्विनी (तेजस्विनी टप्पा २)**

८०. आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) सहाय्यित 'नवतेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास' हा एकूण ५२२ कोटी ९८लाख रुपये खर्चाचा प्रकल्प असून हा प्रकल्प सहा वर्षांच्या कालावधीकरीता राबविण्यात येणार आहे या प्रकल्पाच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता बचत गटातील दहा लाख महिलांना उपजिविकेसाठी साधने तर उपलब्ध होतीलच, शिवाय त्यांच्या व्यवसायामध्ये मूल्यवृद्धीदेखील होईल.

**महिला व बाल सशक्तीकरण योजना**

८१. महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ३ टक्के नियतव्यय राखून ठेवण्याचा निर्णयही आपण घेतला आहे. त्यातून प्रत्येक वर्षी किमान ३०० कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध होईल, असा विश्वास आहे.

**महिला राज्य राखीव पोलीस गट**

८२. आजच्या महिला दिनाच्या निमित्ताने राज्य राखीव पोलीस दलाचा राज्यातील पहिला स्वतंत्र महिला गट स्थापन करण्याची घोषणाही मी येथे करतो आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महिला व बालविकास विभागास २ हजार २४७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. केंद्राकडून प्राप्त होणारा १ हजार ३९८ कोटी ६६ लाख रुपये नियतव्यय विचारात घेता या विभागासाठी एकूण तरतूद ३ हजार ६३७ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

## कामगार

**संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना**

८३. कोरोना काळातील टाळेबंदीचा फटका समाजातील सर्वच घटकांना बसला असला तरी या काळात सर्वाधिक कुचंबणा झाली, ती असंघटित क्षेत्रातल्या कष्टकऱ्यांची. त्यातही घरकाम करणाऱ्या आमच्या मायभगिनींची दुरावस्था आणखी दुर्दैवी झाली. या मायभगिनी यापुढे अशा संकटांत मदतीपासून वंचित राहू नयेत

म्हणून त्यांची नोंदणी व त्यांना आधार ठरेल अशी संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना मी जाहीर करीत आहे. या महिलांच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणासाठी ‘समर्पित कल्याण निधी’ निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी बीजभांडवल म्हणून आज मी २५० कोटी रुपये जाहीर करीत आहे. जमा होणाऱ्या एकूण निधीतून घरकाम करणाऱ्या मायभगिनींसाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येतील.

नवीन न्यायालयाची स्थापना

८४. राज्यात महिला व बालकांवरील अत्याचाराचे खटले (POCSO) त्वरेने निकाली निघावेत यासाठी १३८ विशेष जलद गती न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. त्यासाठी १०३ कोटी ५० लाख रुपये खर्च होणार असून आवश्यक मनुष्यबळास मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता विधी व न्याय विभागास ४८२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

८५. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गहू, तांदूळ, तूर, मका इ. धान्याची पुरेशी साठवणूक क्षमता निर्माण करण्यासाठी नाबार्डच्या सहाय्याने राज्यात २८० नवीन गोदामे बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी आतापर्यंत ३३४ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले असून सन २०२१-२२ करीता ११२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास ३२१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## गृह

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळा

८६. राज्यातील सर्व ८ न्याय सहाय्यक प्रयोगशाळांमध्ये स्वतंत्र POCSO DNA विश्लेषण विभाग, संगणक गुण्य विभाग, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण विभाग आणि संगणकीय न्याय सहाय्यक उत्कृष्टता केंद्र सुरु करण्यात येईल. नागपूर येथील प्रादेशिक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये ‘वन्य जीव डीएनए तंत्रज्ञान विभाग’ सुरु करण्यात येणार आहे.

८७. कोयनानगर, तालुका पाटण, जिल्हा सातारा येथे नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येईल.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृह विभागास १ हजार ७१२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## गृहनिर्माण

**एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली**

८८. राज्यातील घरांच्या बांधकाम परवान्यांमध्ये पारदर्शकता, गतिमानता आणि एकसूत्रता आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका व विशिष्ट क्षेत्र वगळता राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे व मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर करण्यात आली आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृहनिर्माण विभागास ९३१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य

**पर्यटन धोरण**

८९. राज्यातील शेतकऱ्यांना शेती पुरक व्यवसाय तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळावी यासाठी महाविकास आघाडी सरकारने कृषी पर्यटन धोरण जाहीर केले आहे. समुद्र किनाऱ्यावरील स्थानिकांना रोजगाराच्या संधी व पर्यटकांना आकर्षण म्हणून राज्याचे ‘बीच शॅक’ आणि ‘कॅराव्हॅन’ पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन धोरणही लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ‘हेरीटेज वॉक’ या उपक्रमास मुंबई शहरात उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे, हेही यानिमित्ताने आपल्याला सांगितले पाहिजे.

९०. महाबळेश्वर, पाचगणी तसेच लोणार सरोवराच्या विकासाचा आराखडा अंतिम झाला असून त्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो आहे.

९१. पालघर या आदिवासीबहुल नवीन जिल्ह्यातील जव्हार येथे गिरीस्थान पर्यटनस्थळ विकसित करण्यात येणार असून या जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांच्या विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत.

९२. वरळी दुग्धशाळेच्या १४ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन संकुलाची निर्मिती करण्याची घोषणा मागील अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आली होती. सदर पर्यटन संकुलाच्या विकासाकरिता जागा हस्तांतरणाची प्रक्रिया व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.

**पर्यटनासाठी जेट्टी बांधणे**

९३. काशिद (ता. मुरूड, जि. रायगड) येथे पर्यटनासाठी जेट्टी विकसित करणे व भगवती बंदर (ता. जि. रत्नागिरी) येथे क्रुज टर्मिनलचे बांधकाम, अशी दोन कामे हाती घेण्यात आली आहेत.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पर्यटन विभागास १ हजार ३६७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**महाराष्ट्र राज्य संग्रहालय**

९४. महाराष्ट्र राज्याचा वैभवशाली इतिहास दर्शविणारे आणि कला व सांस्कृतिक घडामोडींचे महासंस्कृती केंद्र ठरेल, असे महाराष्ट्र राज्य संग्रहालय उभारण्याचा शासनाचा मानस आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सांस्कृतिक कार्य विभागास १६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**साखर संग्रहालय**

९५. पुण्यातील साखर संकुलात सुमारे ४० कोटी रुपये खर्चून साखर संग्रहालय उभारण्याचे प्रस्तावित असून या संग्रहालयामध्ये महाराष्ट्रातील साखर उद्योगात कालानुरुप झालेली प्रगती, साखर व इतर आनुषंगिक उद्योगांविषयाची माहिती असेल.

**प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन**

९६. आपल्या प्राचीन परंपरा, श्रद्धास्थाने व संस्कृतीचे जतन करणे हे आपले सर्वांचेच आद्य कर्तव्य आहे. शेकडो वर्षांचा वारसा असलेल्या व स्थापत्य शैलीसाठी प्रसिद्ध असलेल्या प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याचे काम म्हणूनच आमच्या शासनाने प्राधान्याने ठरविले आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील निवडक आठ प्राचीन वैशिष्ट्यपूर्ण मंदिरे त्यासाठी निवडली आहेत. धूतपापेश्वर मंदिर (ता. राजापूर, जि. रत्नागिरी), कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर), एकविरा माता मंदिर, कार्ले (ता. मावळ, जि. पुणे), गोंदेश्वर मंदिर (ता. सिन्नर, जि. नाशिक), खंडोबा मंदिर, सातारा (ता. जि. औरंगाबाद), भगवान पुरुषोत्तम मंदिर, पुरुषोत्तमपुरी (ता. माजलगाव, जि. बीड), आनंदेश्वर मंदिर, लासूर (ता. दर्यापूर, जि. अमरावती), शिव मंदिर, मार्कंडा (ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) या मंदिरांचा त्यात समावेश आहे.

या कामांसाठी सन २०२१-२२ मध्ये १०१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## सामाजिक विकास कार्यक्रम

### सामाजिक न्याय व विशेष सहाय्य

**शासकीय निवासी शाळांमध्ये सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम सुरू करणे**

९७. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील एका शासकीय निवासी शाळेमध्ये पथदर्शी तत्वावर इयत्ता ६वी पासून सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम सुरु करण्यात येईल.

**दिव्यांगांच्या सुविधेकरीता वेब ॲप्लीकेशन तयार करणे**

९८. दिव्यंगत्वाचे यापूर्वी ६ प्रकार होते, त्यात वाढ करुन दिव्यंगत्वाच्या यादीत आता २१ प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. दिव्यांग व्यक्तींच्या गरजा ओळखून त्यांना मदत होईल, असे वेब ॲप्लिकेशन तयार करण्यात येत आहे.

**तृतीयपंथी घटकातील लाभार्थींसाठी बीज भांडवल योजना**

९९. तृतीयपंथी घटकातील व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी नवीन बीज भांडवल योजना सुरु करण्यात येणार आहे.

**स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ**

१००. स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाला कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा यासाठी साखर कारखान्यांकडून ऊस गाळपानुसार प्रति टन १० रुपये आकारुन प्राप्त होणाऱ्या निधीच्या समप्रमाणात राज्य शासन दरवर्षी अनुदान देईल.

सन २०२१-२२ या वर्षासाठीच्या कार्यक्रम खर्चाकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास सर्वसाधारण योजनेतून २ हजार ६७५ कोटी रुपये व अनुसूचित जाती घटक योजनेतून १० हजार ६३५ कोटी रुपये असा एकूण १३ हजार ३१० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

### आदिवासी विकास

**मॉडेल निवासी शाळा**

१०१. शासकीय आदिवासी आश्रमशाळांचे मॉडेल निवासी शाळांमध्ये रुपांतर करण्याचे प्रस्तावित असून पहिल्या टप्प्यात १०० आश्रमशाळांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

एकलव्य निवासी शाळा

१०२. राज्यामध्ये या घडीला २५ एकलव्य मॉडेल निवासी शाळा सुरु आहेत. या शाळांमध्ये इयत्ता सहावी ते बारावी पर्यंत सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमांचे शिक्षण देण्यात येते. पुढील ३ वर्षांमध्ये या शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाचे इयत्ता १ली ते ५वी चे वर्ग सुरु करण्यात येणार आहेत.

आदिम जमातींकरिता एकात्मिक वसाहत

१०३. राज्यात कातकरी, कोलाम व माडीया गोंड या तीन आदिम जमाती आहेत. रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा येथे पथदर्शी तत्वावर कातकरी समाजाची एकात्मिक वसाहत वसविण्याचे प्रस्तावित आहे. या वसाहतीमध्ये आदिम जमातीच्या लाभार्थींना घरकुल, शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधा, रोजगार निर्मितीसाठी कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. कोलाम व माडीया गोंड या आदिम जमातींसाठीदेखील अशाच प्रकारे एकात्मिक वसाहती वसविण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता आदिवासी विकास विभागास ९ हजार ७३८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## इतर मागास बहुजन कल्याण

महाज्योती, सारथी व बार्टी

१०४. वेगवेगळया समाजघटकांच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या महाज्योती, सारथी व बार्टी या संस्थांना विविध योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येकी १५० कोटी रुपये तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

१०५. श्री अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी १०० कोटी एवढे अतिरिक्त भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ

१०६. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची कोकण विभागाकरीता उपकंपनी असलेल्या शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळासाठी ५० कोटी रुपये अतिरिक्त भागभांडवल उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ

१०७. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास भागभांडवलाकरीता १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ

१०८. वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाला भागभांडवलाकरीता १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना

१०९. धनगर समाजासाठी राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गातील लाभार्थींकरीता ‘क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना’ राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता इतर मागास बहूजन कल्याण विभागास ३ हजार २१० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

डोंगरी भागासाठी मूलभूत सुविधा

११०. राज्यात डोंगरी विभागातील गावे, वाड्या-वस्त्या तसेच डोंगरपठारावरील वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी डोंगरी विकास निधी व इतर योजनांतून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. विमुक्त जाती, भटक्या जमाती, आदिवासी तसेच धनगर समाजाच्या वस्त्यांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी २५० कोटी रुपये नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे.

## अल्पसंख्यांक विकास

१११. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्यांक घटकांच्या विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलामध्ये २०० कोटी रुपये एवढी वाढ करण्यात येईल.

हजरत ख्वाजा शमनामिरा दर्गा विकास

११२. सांगली जिल्ह्यातील मिरज येथील हजरत ख्वाजा शमनामिरा दर्गा परिसराच्या विकासाकरिता पुरेसा निधी देण्यात येणार आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता अल्पसंख्यांक विकास विभागास ५८९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## नियोजन व रोहयो

राष्ट्रपिता महात्मा गांधी : एक अनुभूती

११३. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५०वी जयंती गेल्यावर्षी साजरी झाली. या जयंती वर्षामध्ये सुरु केलेली १६२ कोटी ५२ लाख रुपये रकमेची सेवाग्राम विकास आराखड्याची कामे सध्या सुरु आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या

विचारांचा व्यापक प्रसार व त्यांचा वारसा जतन करुन तो नवीन पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याकरिता वर्धा जिल्ह्यात एक विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सिंधुरत्न समृद्ध योजना**

११४. सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक साधनसामुग्रीवर आधारित पर्यटन, मत्स्य व्यवसाय व सूक्ष्म उद्योगांचा विकास करण्यासाठी 'सिंधुरत्न समृद्ध' ही पथदर्शी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेकरीता पुढील तीन वर्षात दरवर्षी १०० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**मानव विकास कार्यक्रम**

११५. मानव विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्या २३ जिल्ह्यातील १२५ मागास तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या तालुक्यातील महिला बचतगट आणि अनुसूचित जाती जमातींचे सक्षमीकरण करण्याकरीता रोजगार निर्मितीवर अधिक भर देण्यासाठी प्रत्येक तालुक्याला २ कोटी रुपये याप्रमाणे २५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. या कार्यक्रमांतर्गत नंदुरबार व गडचिरोली या आंकांक्षित जिल्ह्यात आदिवासींच्या उपजीविका वृद्धीसाठीच्या 'आमचूर' व 'मोहफूल' प्रकल्पाला मंजुरी देण्यात येणार आहे.

**राज्य नियोजन भवन**

११६. बृहन्मुंबईमध्ये 'राज्य नियोजन भवन' बांधण्याचे प्रस्तावित आहे. या भवनाची अंदाजित किंमत २०० कोटी रुपये आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागास ४ हजार ८६२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**रोजगार हमी योजना**

११७. चालू आर्थिक वर्षात जवाहर विहिरी, फलोत्पादन, शेततळी, जलसंधारणाची कामे, शेत पाणंद रस्त्यांची कामे इत्यादींकरीता रोजगार हमी योजनेसाठी सन २०२१-२२ मध्ये १ हजार २३१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## पर्यावरण व वने

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**

११८. पर्यावरण विभागाचे नामकरण 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग' असे करण्यात आले आहे, हे आपल्याला माहीतच आहे. 'माझी वसुंधरा' हा पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचा अभिनव उपक्रम या विभागाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमातून नागरिकांना वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल जागरुक केले जाईल.

प्रदूषण नियंत्रणाकरीता उपाययोजना

११९. औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण कमी करण्याकरता सध्या अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांमध्ये अधिक सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विस्तृत प्रस्ताव तयार केला असून त्यासाठी ३ हजार ४८७ कोटी ५० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यान, नागपूर

१२०. विदेशी पर्यटकांना आकर्षित करून त्यांना स्थानिक संस्कृतीची ओळख करुन देण्यासाठी नागपूर येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानात 'गोंडवना थीम पार्क' ची निर्मिती करण्यात येत आहे, तिथे सफारीही सुरु करण्यात येणार आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

१२१. मुंबई महानगराचे फुफ्फुस असणाऱ्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सिंह सफारी व व्याघ्र सफारीची पुनर्रचना, प्राणी संग्रहालयात नवीन प्रजातींचे प्राणी आणणे, इ-बस, इ-गोल्फ कार्ट, फुलपाखरु उद्यान इत्यादी अभिनव उपक्रम सुरु करण्यात येत आहेत.

वृक्षाच्छादनात भर घालणे

१२२. दुर्गम भागात पारंपारिक पद्धतीने वृक्ष लागवड करण्यात येणाऱ्या मर्यादा विचारात घेता, या पुढील काळात तज्ज्ञांच्या सल्ल्याने हवाई बीज पेरणी तंत्रज्ञानाद्वारे वृक्षारोपण करण्याचे शासनाने ठरविले आहे. समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा वृक्षराजी निर्माण करण्यावरही विशेष भर देण्यात येत आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वन विभागास १ हजार ७२३ कोटी रुपये आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास २४६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## तीर्थक्षेत्र विकास आणि स्मारके

तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम

१२३. देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी महाराष्ट्रातील श्री क्षेत्र परळी वैजनाथ (ता. परळी, जि. बीड), श्री क्षेत्र औंढा नागनाथ (ता. औंढा, जि. हिंगोली), श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) आणि श्री क्षेत्र भीमाशंकर (ता. खेड, जि. पुणे) या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता विशेष निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

'खंडेरायाची जेजुरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र जेजुरी गड (ता. पुरंदर, जि. पुणे), श्री क्षेत्र बिरदेव देवस्थान, निरा व भीमा नदीच्या पवित्र

संगमावर वसलेले श्री क्षेत्र निरा नृसिंहपूर (ता. इंदापूर, जि. पुणे) आरेवाडी (ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली), या तीर्थक्षेत्रांच्या विकास आराखड्यांकरीताही निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्री क्षेत्र मोझरी आणि श्री क्षेत्र कौंडण्यपूर (ता. तिवसा, जि. अमरावती), तसेच संत गाडगेबाबा निर्वाणभूमी, वलगांव (ता. जि. अमरावती), येथे मूलभूत सुविधा आराखड्यांकरीता निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धशक्तीपीठ मानल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र सप्तश्रृंगी गड (ता. कळवण, जि. नाशिक), संत श्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज मंदिर, त्र्यंबकेश्वर (ता. त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक), श्री क्षेत्र भगवानगड (ता. पाथर्डी, जि. अहमदनगर), श्री क्षेत्र नारायण गड आणि श्री क्षेत्र गहिनीनाथ गड (ता. पाटोदा, जि. बीड), या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीताही निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री, महाड, पाली तसेच सिद्धटेक या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी अष्टविनायक तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**श्री क्षेत्र नरसी नामदेव, ता. जि. हिंगोली तीर्थक्षेत्र विकास आराखडा**

१२४. संत नामदेव महाराज यांनी वारकरी संप्रदायाचा देशभर विस्तार केला. सन २०२१ हे संत नामदेव महाराज यांचे ७५० वे जयंती वर्ष आहे. त्या निमित्ताने संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थान असलेल्या श्री क्षेत्र नरसी नामदेव (ता. जि. हिंगोली) या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**संत बसवेश्वर महाराज स्मारक, मंगळवेढा**

१२५. संत बसवेश्वर महाराज यांचे महाराष्ट्रातील मंगळवेढा, जि. सोलापूर येथे ३० वर्षाहून अधिक काळ वास्तव्य होते. त्यांनी सर्वसामान्यांना समता, श्रमप्रतिष्ठा व सदाचाराची शिकवण दिली. संत बसवेश्वर महाराज यांच्या स्मरणार्थ मंगळवेढा, जि. सोलापूर येथे स्मारक उभे करण्यासाठी सन २०२१-२२ मध्ये आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**श्री क्षेत्र पोहरादेवी**

१२६. बंजारा समाजाचे आराध्य दैवत असलेले जगद्गुरु संत सेवालाल महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या श्री क्षेत्र पोहरादेवी (ता. मानोरा, जि. वाशिम) या धार्मिक स्थळाच्या विकास आराखड्याची कामे प्रगतीपथावर आहेत. ती पूर्ण करण्याकरीता आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना**

१२७. स्वर्गीय शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या व्याजातून ज्येष्ठ पत्रकारांना निवृत्तिवेतन दिले जाते. त्यासाठी सध्या २५ कोटी रुपयांची ठेव असून त्यात मी आज १० कोटी रुपयांची भर जाहीर करतो. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या पोंभुर्ले (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथील स्मारकासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

## इमारती / प्रशासकीय भवन

**नागपूर येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे**

१२८. राज्याच्या उप राजधानीला साजेल अशा भव्य प्रशासकीय इमारतीचे बांधकाम नागपूर येथे हाती घेण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी २५० कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महसूल विभागास २८९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सुंदर माझे कार्यालय**

१२९. राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांचा कायापालट करण्यासाठी ‘सुंदर माझे कार्यालय’ हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानामुळे शासकीय कार्यालयातील वातावरणात बदल तसेच सेवांच्या गुणवत्तेत वाढ होऊन शासन अधिकाधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यालयांना राज्य, विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर पुरस्कार देण्यात येतील.

सन २०२१-२२ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामान्य प्रशासन विभागास १ हजार ३५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

## वार्षिक योजना

**जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२**

१३०. सन २०२०-२१ च्या योजनेअंतर्गत ९ हजार ८०० कोटी रुपयांच्या तुलनेत या वर्षी १ हजार २३५ कोटी रुपये इतकी वाढीव तरतूद करण्यात आली असून सन २०२१-२२ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेसाठी ११ हजार ३५ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध होणार आहे.

**वार्षिक योजना २०२१-२२**

१३१. सन २०२१-२२ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम १ लाख ३० हजार कोटी रुपये एवढी निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचीत जाती उपयोजनेच्या १० हजार ६३५ कोटी रुपये तर आदिवासी विकास उपयोजनेच्या ९ हजार ७३८ कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

**सुधारित अंदाज २०२०-२१**

१३२. सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात महसूली जमा ३ लाख ४७ हजार ४५७ कोटी रुपये अपेक्षित होती. मात्र, यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे यावर्षी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या राज्य हिश्श्याच्या कराच्या रकमेत १४ हजार ३६६ कोटी रुपये घट झाली. या सर्व बाबींचा विचार करून महसुली जमेचे सुधारीत उद्दीष्ट २ लाख ८९ हजार ४९८ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहे. सन २०२०-२१ च्या एकूण खर्चाचा अर्थसंकल्पीय अंदाज ४ लाख ४ हजार ३८५ कोटी रुपये व सुधारीत अंदाज ३ लाख ७९ हजार ५०४ कोटी रुपये इतका आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२**

१३३. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपये व महसुली खर्च ३ लाख ७९ हजार २१३ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी १० हजार २२६ कोटी रुपये महसुली तूट येत आहे. लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी ही तूट स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. यावर्षी अर्थव्यवस्थेला गती देणे व रोजगार निर्मितीकरीता मुलभूत बाबींवर खर्च करण्यासाठी ५८ हजार ७४८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे राजकोषीय तूट ६६ हजार ६४१ कोटी रुपये इतकी होईल. ही राजकोषीय तूट स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. राज्याच्या विकासासाठी जी उद्दिष्टे निश्चित केली आहेत, त्यांच्या पूर्तीसाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करेल, अशी ग्वाही मी आपल्या माध्यमातून या सभागृहास आणि राज्यातील जनतेला देतो व अर्थसंकल्पाच्या भाग दोनकडे वळतो.